मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१ ला मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

क्र.एमपीसी-२०२३/प्र.क्र.१५६/महामंडळे दिनांक:- १ जानेवारी, २०२४.

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
७ वा मजला, (विस्तार इमारत) मंत्रालय, मुंबई.

विषय :- महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित" (महाप्रित)" या उपकंपनीत "विशेष कार्य अधिकारी" या पदाची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

महोदय,

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत "महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित" (महाप्रित)" या उपकंपनीत "विशेष कार्य अधिकारी" या पदावर ३ वर्षाकरीता पात्र व्यक्तीची करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर पदासाठी अर्ज करण्याचा अंतिम दिनांक १०/०१/२०२४ हा आहे.

सदर पदाच्या भरतीबाबतची माहिती सोबत जोडली असून ती महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करुन देण्यात यावी, ही विनंती.

आपला

(रा.अ.पावळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-निवडनस्ती.

O/c

Email केले.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२.

क्र.एमपीसी-२०२३/प्र.क्र.१५६/महामंडळे

सेवानिवृत्त सनदी अधिकारी (भा.प्र.से) यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असणा-या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रोद्योगिकी मर्या., मुंबई (महाप्रित) या उप कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. सदर कंपनीमार्फत राबविण्यात येणारे विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकरिता अनुभव असलेल्या व भारतीय प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या सनदी अधिका-यांमधून विशेष कार्य अधिकारी या पदावर ३ वर्षाच्या कालावधीकरीता, महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रोद्योगिकी मर्या., मुंबई (महाप्रित) या उप कंपनीत करार पध्दतीने पात्र व्यक्तीची नियुक्ती करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३.दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व समक्रमांकाच्या दि.२५.०२.२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज करावेत. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक:- १०.०१.२०२४ असा आहे.

सो.ना.बागूल
शासनाचे सह सचिव

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१ ला मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID : mahamandle.sjsa@mah.gov.in


क्र.एमपीसी-२०२३/प्र.क्र.१५६/महामंडळे दिनांक:-२९ डिसेंबर, २०२३.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत "महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित" (महाप्रित)" ही उपकंपनी स्थापन करण्यात आली असून सदर उपकंपनीस मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक १० जुलै, २०२३ च्या शासन निर्णयानुसार शासन ते शासन (Govt. to Govt.) प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर महाप्रित उप कंपनीमार्फत "नागरी पुनर्निर्माण कार्यक्रम" राबविण्यात येत असून त्यात पायाभूत सुविधा प्रकल्प, परवडणारी घरे व शहरी नियोजन, ऊर्जा कार्यक्षमता तसेच इतर महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. सदर प्रकल्प पूर्णत्वास नेणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरिता भारतीय प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या सनदी अधिकाऱ्यांमधून महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित" (महाप्रित)" या उपकंपनीत "विशेष कार्य अधिकारी" या पदावर ३ वर्षाकरीता पात्र व्यक्तीची करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अटी व शर्ती :-

१. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल परंतु अशा नियुक्तीच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

२. सेवानिवृत्त सनदी अधिकारी (भा.प्र.से.) या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा. लगतच्या दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.

३. उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक १०/१/२०२४ पर्यंत सह सचिव, (महामंडळे) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पहिला मजला (विस्तार), हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग मुंबई ४०००३२ या पत्यावर पोहोचेल अशा रीतीने पोस्टाने /व्यक्तीश: पाठवावा किंवा somnath.bagul@nic.in या ई- मेल वर पाठविण्यात यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी २२०२९५२० या दुरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यहाराची दखल घेतली जाणार नाही.

४. उमेदवाराच्या निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील. करार पध्दतीने नियुक्त सेवानियुक्त अधिका-यांस सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीतील महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत "महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित, मुंबई" (महाप्रित)" या उपकंपनीत काम करावे लागेल.

५. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

७. उमेदवार मुंबई लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळांतर्गत "महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित" (महाप्रित)" ही उपकंपनीस आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही. .

१०. प्राप्त अर्जांमधून पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा राहील.

११. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३. दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(सो.ना.बागुल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

## अर्जाचा नमुना

प्रति,

सह सचिव (महामंडळे)
सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

विषय:- सेवानिवृत्त सनदी अधिका-यांची करार तत्वावर नियुक्ती करण्याबाबत....

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने मी विनंतीणुवक अर्ज करतो/ करते की, मी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती पूर्ण करीत असून आपल्या विभागाच्या जाहिरातीत नमूद केलेले काम करण्यास इच्छुक आहे. त्यासाठी माझी खाली नमुद केल्यानुसार माहिती सादर करीत

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदराचे संपूर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व विभाग | |
| ४ | भ्रमनध्वनी क्रमांक | |
| ५ | जन्म दिनांक, सेवानिवृत्ती दिनांक व अर्जाच्या दिनांकास वय | |
| ६ | शासकीय सेवेत आल्याचा दिनांक / शासकीय सेवेत आल्यापासून सेवानिवृत्ती पर्यंत धारण केलेली पदे व कार्यालय | |
| ७ | अनुभव (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |
| ८ | सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन (संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |

| | | |
|---|---|---|
| ९ | अर्जदाराविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसलेबाबतचे संबंधित विभागाचे प्रमाणपत्र | |
| १० | सध्यस्थितीत मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन (संबंधित कोषागार कार्यालयाचे प्रमाणपत्रासह) | |
| ११ | नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील, याबाबतचे हमीपत्र | |

ठिकाण:

दिनांक:

स्वाक्षरी